मराठवाडा विकास  कार्यक्रमांतर्गत मराठावाडा विभागात
मत्स्यव्यवसाय विकासाच्या योजनेस मान्यता देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. मत्स्यवि २४०७/प्र.क्र. १९२/पदुम-१३,
मंत्रालय विस्तार, मुंबई  ४०००३२
दिनांक १५ जानेवारी, २००८

संदर्भ :- गुरूवार दि.२५/१०/२००७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळ  बैठकीचे कार्यवृत्त, सामान्य प्रशासन विभागाचे पत्र १४/११/२००७.

**प्रस्तावना :-**

मराठवाडा हा मागास भाग असून राज्यातील इतर भागासमवेत मराठवाडयाचा देखिल विकास होण्याच्या दृष्टिने  मराठवाडयतील  कृषी संलग्न क्षेत्रात विकास दर ६ टक्के नेण्याचे उद्दिष्ठ ११ व्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आालेले आहे.  त्यामुळे या क्षेत्राचा विकास दर वाढविणे आवश्यक आहे, हे विचारात घेवून मत्स्यव्यवसाय विकासासाठी मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण, मत्स्यव्यवसाय विकासासाठी केंद्राचे बळकटीकरण, मत्स्यबीज संचयन, झिंगाबीज संचयन, मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतुक सुविधा उपलब्ध करून देणे आदि योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

मराठवाडा विभागातील ८ जिल्हयात एकूण ६४० जलाशय आहेत. या जलाशयांचे जलक्षेत्र ५४०१३ हेक्टर इतके आहे. या जलाशयाव ५५० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत आहेत.  या विभागाचे वार्षिक मत्स्यउत्पादन १८००० मे.टन इतके आहे. मच्छिमारांचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यासाठी सन २००८-०९ व २००९-१० या दोन आर्थिक वर्षात खालील योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) **मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण :-** मराठवाडा विभागातील ८ जिल्हयातील १४ मत्स्यबीज केंद्राचे बळकटीरण करणे आवश्यक आहे. ही केंद्रे २० वर्षापूर्वी बांधलेली आहेत. या केंद्रातील संचयन व संवर्धन तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे, पाईप लाईन दुरुस्ती, वर्तुळाकार हॅजरीची दुरुस्ती इ. कामे हाती घेणे आवयक आहे. यासाठी रू. १६८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

२) **मत्स्यबीज संचयन :-** मराठवाडा विभागातील उपलब्ध जलक्षेत्रात इष्टतम मत्स्यबीज संचयनाची गरज भागविणे आवश्यक आहे. कार्यरत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती सदृढ नसल्याने या संस्था इष्टतम संचयन करू शकत नाहीत. म्हणून एकूण इष्टतम मत्स्यबीज संचयनापैकी प्रथम ५० टक्के संचयन विभागामार्फत करण्याचे या कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित आहे. यासाठी रूपये १५० लाख अपेक्षित आहे.

३) **झिंगाबीज संचयन :-** गोडया पाण्यातील झिंग्यास जास्त मागणी व जास्त दर मिळत असल्याने झिंगा उत्पादनास चालना देणे आवश्यक आहे. मत्स्यबीज संचयनास काही प्रमाणात झिंगाबीज संचयन केल्यास अधिक झिंगा उत्पादन होईल. या योजनेंतर्गत १०८०.२६ लाख झिंगाबीज संचयन करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या १६,९४७ सभासदांना आर्थिक लाभ होईल यासाठी रू १०००.०० लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

४) **मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण :-** मराठवाडा विभागातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या १६,९४७ इतकी आहे. यापैकी ४० सहकारी संस्थांना मासळी खरेदी विक्री व वाहतुक इ.साठी भाग भांडवल देण्याचे प्रस्तावित आहे. प्रत्येक सहकारी संस्थेला रू ४.०० लक्ष याप्रमाणे रू १६०.०० लाख खर्च अपेक्षित आहे.

५) **मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा :-** मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांनी पकडलेली मासळी त्वरीत जवळच्या बाजारात विक्रीसाठी नेणे व संस्करण केंद्रावर पोहोचविण्यासाठी प्रत्येक संस्थेच्या क्रियाशील मच्छिमारांपैकी २० सभासद सायकली तसेच मासळी जास्त वेळ टिकवून ठेवण्यासाठी शीतपेटया देण्याचे प्रस्तावित आहे. मराठवाडा विभागातील पात्र सहकारी संस्थांच्या सभासदांना ३,०४८ व शीतपेटया पुरविण्यासाठी रू १२२.०० लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

मराठवाडा विकास योजने अंतर्गत मंत्रीमंडळ मत्स्यव्यवसाय विभागासाठी एकूण रू १६.०० कोटी इतक्या खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार योजना सन २००८-२००९ व २००९-१० मध्ये राबवावयाची आहे. उक्त योजनासाठी रू १६.०० कोटी (रूपये १६ कोटी फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर दोन वर्षासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( शु.अ. गद्रे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन ,**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, औरंगाबाद,
विभागीय आयुक्त, औरंगाबाद, लातूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी,
हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर